**MHBI090000182024**

दाखल दिनांक : ०४.०१.२०२४
नोंदणी दिनांक : ०८.०१.२०२४
निकाल दिनांक : ०७.०५.२०२६
कालावधी : ०२वर्षे ०४म. ०३दि.

| | |
|---|---|
| | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,(न्यायालय क.१), माजलगांव यांचे न्यायालयात**<br>**( पिठासीन अधिकारी—आर.बी.पोळ )**<br><br>**नि.फौ.खटला क. १५/२०२४ नि.क्र. ४३** |
| | **गुन्हा नोंदणी क. ३१९/२०२३ शहर पो.स्टे. माजलगांव** |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन** |
| **द्वारे प्रतिनिधी** | **श्री.जे.बी.शिंदे, सरकारी अभियोक्ता.** |
| आरोपी — | १. मजहर नजर सय्यद, वय ३४ वर्षे,<br>२. अजहर नजर सय्यद, वय ४० वर्षे<br>३. सय्यद अबुजर अझहर, वय १९ वर्षे<br>४. शमीम अजहर सय्यद, वय ३५ वर्षे<br>५. परवीन अशरफ सय्यद, वय ४० वर्षे<br>६. तेहराबी नाजर सय्यद, वय ५६ वर्षे<br>७. शेख तेहसिन फरीद, वय ४६ वर्षे<br>सर्व रा.पात्रुड ता.माजलगांव, जि.बीड |
| **द्वारे प्रतिनिधी** | **श्री.एन.एस.सय्यद, विधीज्ञ.** |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १७.१२.२०१७ नंतर |
| गुन्हा नोंद केल्याची तारीख | २०.०९.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | ०४.०१.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २२.०४.२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | १६.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | ०७.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०७.०५.२०२६ |

| | |
|---|---|
| शिक्षा सुनावली असल्यास तारीख | —— |

**आरोपींचा तपशील**

| अ क्र. | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जमीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | निर्दोष की दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षे दरम्यान स्थानबध्दतेत गेलेला कालावधी फौ.प्र.सं. ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मजहर नजर सय्यद | फौ.प्र.सं. कलम ४१(१) प्रमाणे नोटीस | २२.०४.२०२४ | ४९८—अ, ३२३,५०४,५०६,३४ | निर्दोष | —— | —— |
| २ | अजहर नजर सय्यद | सदर | सदर | सदर | सदर | सदर | सदर |
| ३ | अबुजर अझहर सय्यद | सदर | सदर | सदर | सदर | सदर | सदर |
| ४ | शमीम अजहर सय्यद | सदर | सदर | सदर | सदर | सदर | सदर |
| ५ | परवीन अशरफ सय्यद | सदर | सदर | सदर | सदर | सदर | सदर |
| ६ | तेहराबी नाजर सय्यद | सदर | सदर | सदर | सदर | सदर | स्दर |
| ७ | शेख तेहसिन फरीद | सदर | सदर | सदर | सदर | सदर | सदर |

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| *अ.क्र.* | *साक्षीदारांचे नाव* | *पुराव्याचे स्वरूप* | *नि.क्र.* |
|---|---|---|---|
| १ | रेश्मा मजहर सय्यद | फिर्यादी | ४१ |

आरोपीने पुरावा दिलेला नाही. न्यायालयाचा साक्षीदार नाही.

**अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक**

| *अ.क्र.* | *नि. क्र.* | *वर्णन* |
|---|---|---|
| १ | ४२ | फिर्याद |

**महत्वाचा वस्तुजन्य पुरावा**

| *अ.क्र.* | *महत्वाचा वस्तुजन्य पुरावा* | *वर्णन* |
|---|---|---|
| | —— | —— |

**—:: न्यायनिर्णय ::—**
**(दिनांक ०७.०५.२०२६ रोजी पारीत)**

आरोपींनी या कामी भारतीय दंड संहिता कलम ४९८—अ,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे :—**

२. फिर्यादीचे कथन की, तिचे लग्न दि. १७.१२.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. अकसा मस्जीद येथे मुस्लीम धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे आरोपी क्र. १ सोबत सर्व संसार उपयोगी सामान, सोनेनाणे देवून थाटामाटात झाले. लग्न झाल्यानंतर फिर्यादी सासरी नांदण्यास गेली. त्यानंतर फिर्यादीला तिचे सासरचे लोकांनी एक महिना चांगले नांदविले. त्यानंतर फिर्यादीस दोन मुल साहिल व राहील झाली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस 'आमचे मुलाचे लग्न करून चुक केली' असे म्हणून शिवीगाळ करून मारहान करण्यास सुरूवात केली. सदर घटनेबाबत फिर्यादीने तिचे आई वडिलांना सांगितली असता फिर्यादीचे आई वडिलांनी आरोपींना समजावून सांगितले परंतु आरोपींनी काहीएक ऐकले नाही. त्यानंतर फिर्यादीकडे माहेराहून स्वीफ्ट डिझायर गाडी घ ेण्यासाठी हुंड्याचे राहिलेले दोन लाख रु. घेण्याची मागणी केली. सदर मागणी पोटी आरोपी फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ करू लागले. तसेच फिर्यादीस उपाशीपोटी ठेवून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व दि.१२.०८.२०२३ रोजी फिर्यादीस तिच्या मुलासह घराबाहेर हाकलून दिले. तेव्हा पासून फिर्यादी ही माहेरी तिचे आईवडिलांकडे राहते. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्यानुसार गु.र.नं ३१९/२०२३ नोंदविण्यात आला. तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

३. सदर गुन्हयाचा तपास पो.ह. बी.एस.पवार यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घ टनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे जवाब नोंदविले आणि आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयासमोर हजर झाले. आरोपी विरूध्द नि.क्र.१७ वर दोषारोप ठेवण्यात आला व नि.क्र. १८ ते २४ कडे आरोपींचे निवेदन नोंदविले. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन खटला चालविण्याची विनंती केली.

५.　　प्रस्तुतच्या खटल्यास अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आला. अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळून न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही व तसा आदेश नि.क्र.१ वर करण्यात आला.

६.　　अभियोग पक्षाचा व बचाव पक्षाचा युक्तीवाद ऐकला. याकामी उपस्थित होणारे मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहे : —

| *अ.क्र.* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
| --- | --- | --- |
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.१७.१२.२०१७ रोजी लग्न झाल्यानंतर फिर्यादीस सासरी पात्रुड येथे सुरुवातीचे एक महिना चांगले नांदविल्यानंतर तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस माहेराहुन स्विफ्ट डिझायर गाडी घेण्यासाठी एक लाख रुपये घेवून ये तरच तुला नांदवु असे म्हणून शारिरीक व मानसिक त्रास दिला. त्यामुळे भारतीय दंड विधान ४९८—अ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही. |
| २ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्यायोगे भा.दं.वि. कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही. |
| ३ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळ केली तसेच अपमानीत करुन तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभित केले व त्यायोगे भा.दं.वि.कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ..नाही. |
| ४ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की,वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे भारतीय दंड विधान कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असून तो माझे अधिकारकक्षेमध्ये घडला आहे. | नाही.. |

| | | |
|---|---|---|
| ५ | आदेश कोणते ? | आरोपींची निर्दोष मुक्तता केली. |

**—: कारणमिमांसा :—**

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबत :—**

७. मुददा क्र. १ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने ते एकत्रितरित्या विचारात घेण्यात आले आहेत. अभियोग पक्षाचे कथनानुसार फिर्यादीचे लग्न आरोपी क्र.१ सोबत झाल्यानंतर सुरुवातीचे १ महिने सासरच्या लोकांनी तिला चांगले नांदविल्यानंतर फिर्यादीस आरोपींनी आपसात संगणमत करून स्विफ्ट डिझायर गाडी घेण्यासाठी एक लाख रुपयांची मागणी करून तिचा शारिरीक व मानसिक छळ करु लागला तसेच शिवीगाळ करु लागले. त्यानंतर फिर्यादीचे आई वडीलांनी आरोपींना समजावून सांगून देखील आरोपी हे फिर्यादीकडे रुपयांची मागणी करुन उपाशीपोटी ठेवून, मारहाण व शिवीगाळ करुन घराबाहेर हाकलून दिले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. सदरील बाब सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर होती.

८. अभियोग पक्षाने गुन्हा सिध्द करण्याच्या अनुषंगाने फिर्यादी सा.क्र.१ रेश्मा मजहर सय्यद हिची साक्ष नि.क्र.४१ वर नोंदवली. तिने पुराव्यात नमुद केले की, आरोपी क्र. १ हा तिचा पती असुन इतर आरोपी हे तिचे पतीचे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आरोपी क्र.१ बरोबर सन २०१७ मध्ये चॉदणी ग्राउंड येथे झाले होते. त्यानंतर ती नांदण्यास पात्रुड येथे गेली. त्यावेळी सर्व आरोपीं तेथे एकत्र राहत असतांना घरगुती कारणावरून कुरबुर झाली होती. त्यामुळे तिने रागाच्या भरात आरोपींविरूध्द फिर्याद दिली होती. तिने फिर्यादीवरील सही मान्य करून मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदरील फिर्यादी ही अभियोग पक्षाच्या कथनाला दुजोरा देत नसल्याने अभियोग पक्षातर्फे तिला सूचक प्रश्न विचारणेत आले. परंतु त्यांची साक्ष अविचलीत करण्यास अभियोगपक्ष असमर्थ ठरला.

९. फिर्यादीच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीची आरोपीसोबत केवळ कुरबूर झाली होती असे तिने कथन केलेले आहे. परंतु फिर्यादीस आरोपींनी एक लाख रुपयांच्या अवैध मागणीकरीता शारिरीक व मानसिक त्रास दिला, शिवीगाळ करुन मारहाण केली व घराबाहेर हाकलून दिले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे. अशा परिस्थितीत अभियोगपक्षाचे कथनाबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोष केवळ अभियोग पक्षाच्या कथनावर सिध्द होणार

नाहीत.

१०. फिर्यादी तिच्या पुराव्यामध्ये कथन करते की, आरोपी व तिचेमध्ये न्यायालयाबाहेर सामोपचाराने तडजोड झालेली आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, सदरील साक्षीदार हे त्या कारणास्तव अभियोग पक्षाच्या कथनाला दुजोरा देत नाही त्यामुळे त्यांचे तोंडी पुराव्यावर शंका निर्माण होते. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीस एक लाख रु.च्या अवैध मागणीकरीता शारिरीक व मानसिक त्रास दिला, शिवीगाळ करुन मारहाण केली व घराबाहेर हाकलून दिले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली हे सिध्द होत नाही. त्यामुळे सदरचा पुरावा हा आरोपीस शिक्षेस पात्र गुन्हयात दोषी ठरविण्यास उपयुक्त ठरणार नाही.

११. अशा परिस्थितीत न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा विचारात घेतला असता आरोपींचा प्रस्तुत प्रकरणातील सहभाग सिध्द होईल असा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ ते ४ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविले असून मुद्दा क्र. ५ करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**—: आदेश :—**

१. आरोपी क्र. १ ते ७ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४९८—अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी फौजदारी संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/— चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2026.05.07 16:26:47 +0530

दिनांक : ०७/०५/२०२६
ठिकाण : माजलगाव.

**( आर.बी.पोळ)**
प्रथमवर्ग न्यायदंाधिकारी, माजलगाव.

# CERTIFICATE

" I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order"

| | |
|---|---|
| Dictated on | 07/05/2026 |
| Transcribed On | 07/05/2026 |
| Checked & signed on | 07/05/2026 |

Sd/-
( R.M.Shaikh )
Steno Gr-III,
Judicial Magistrate First Class,
Court No.1, Majalgaon.